पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – ४११०१८
माध्यमिक शिक्षण विभाग,
क्र.माध्य/शिक्षण/५/कावि/ ७२० /२०२१
दि. १/१०/२०२१

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शाळांमध्ये इयत्ता ८ वी ते १२ वीचे वर्ग दि. ०४ ऑक्टोंबर २०२१ पासून चालू करणेबाबत ..

संदर्भ :- १. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दि.१५ जुन २०२०
२. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दि.२४ जुन २०२०
३. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दि.२२ जुलै २०२०
४. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दि.१७ ऑगस्ट २०२०
५. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०२०/प्र.क्र.८६/एसडी-६, दि.२९ ऑक्टोबर २०२०
६. केंद्र शासनाच्या दि.०८.०९.२०२०रोजीच्या मार्गदर्शक सूचना.
७. शासन परिपत्रक क्र.संकिर्ण२०२१/प्र.क्र.९४ /एसडी-६, दि.०७ जुलै २०२१
८. शासन परिपत्रक क्र.संकिर्ण२०२१/प्र.क्र.११३ /एसडी-६, दि.१० ऑगस्ट २०२१
९. शासन परिपत्रक क्र.संकिर्ण२०२१/प्र.क्र.११३ /एसडी-६, दि. २४ सप्टेंबर २०२१

**आदेश,**

ज्याअर्थी, संदर्भ क्र. ०९ चे परिपत्रकानुसार राज्यात शहरी भागातील इयत्ता ८ वी ते १२ वी चे वर्ग दि.०४/१०/२०२१ पासून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याकरीता राज्य शासनामार्फत संदर्भ क्र. ७ द ८ अन्वये निर्गमीत करण्यात आलेल्या परिपत्रकातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन व संदर्भ क्र. ९ चे शासन परिपत्रकातील निर्गमित करण्यात आलेल्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन करुन इयत्ता ८ वी ते १२ वीचे वर्ग सुरु करणेकामी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

ज्याअर्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची कोविड १९ साठी RT-PCR/रॅपिड अँटीजेन टेस्ट ही नकारात्मक आलेल्या व कोणत्याही प्रकारची लक्षणे नसलेल्या कर्मचा-यांनाच कामावर हजर करुन घेण्याचे सूचित केलेले आहे. प्रत्यक्ष शाळा सुरु करण्याकरीता शाळेतील १००% शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची कोविड टेस्ट होणे बंधनकारक आहे. त्याच बरोबर सर्व शिक्षकांचे लसीकरण होणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांचे संमतीपत्र भरुन घेणे आवश्यक आहे. शाळा सुरु करण्यापूर्वी शाळा निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन), तापमान मोजणीसाठीची गन, डिजिटल थर्मामीटर, हात धुण्याची व्यवस्था, सोशल डिस्टंसींग प्लॅन इत्यादी. गोष्टींची पालन करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भ क्र. ८ चे शासन परिपत्रकामधील परिशिष्ठ - अ व परिशिष्ठ - ब मधील मार्गदर्शक सूचना व संदर्भ क्र. ९ चे शासन परिपत्रकातील अतिरिक्त मार्गदर्शक सूचनांचे पुर्तता झाल्यावर शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

तथापी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची कोविड १९ साठी RT-PCR/ रॅपिड अँटीजेन टेस्ट चाचणी करुन घेणे तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांचे संमतीपत्र भरुन घेणे, शाळा सुरु करण्यापूर्वी शाळा निर्जंतुकीकरण (सॅनिटायझेशन), तापमान मोजणीसाठीची गन, डिजिटल थर्मामीटर, हात धुण्याची व्यवस्था, सोशल डिस्टंसींग प्लॅन इत्यादी. गोष्टींची पुर्तता करणे तसेच शासन परिपत्रकामधील परिशिष्ठ - अ व परिशिष्ठ - ब मधील अटी व शर्तीची पुर्तता करणेची अटीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमधील इ. ८ वी ते १२ वी पर्यंतच्या सर्व शाळा चालू करण्याचा निर्णय घेणे आवश्यक आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील शाळा सुरु करण्या संदर्भातील या आदेशान्वये ८ वी ते १२ वी चे वर्ग दि. ०४ ऑक्टोंबर २०२१ पासून चालू करण्यास आदेशीत करीत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व प्रकारच्या शाळेत इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ वी चे वर्ग दिनांक ०४ ऑक्टोंबर २०२१ पासून सुरु करणेस खालील मार्गदर्शक सूचना / अटींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

१) शाळा सुरु करणेबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेमार्फत दिनांक १० ऑगस्ट २०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचना / अटी (SOP) व दिनांक २४ सप्टेंबर २०२१ चे शासन परिपत्रकातील अतिरिक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.
२) शाळेत स्वच्छता व निर्जंतुकीकरण विषयक सुविधा सुनिश्चित करणेकामी Thermometer, Thermal Scanner / Gun, Pulse Oximeter, जंतुनाशक, साबण, पाणी इत्यादी आवश्यक वस्तूंची उपलब्धता असलेबाबत दक्षता घ्यावी.
३) शाळा वाहतूक सुविधांचे निर्जंतुकीकरण नियमित होत असलेबाबत व याबाबत उपाययोजना केली आहे किंवा नाही याचा शाळा व्यवस्थापनाने पडताळणी करणे आवश्यक राहील.

४) शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी कोविड – १९ साठीची ४८ तासापूर्वीची RTPCR चाचणी बंधनकारक असून चाचणीचे प्रयोगशाळेने दिलेले प्रमाणपत्र शाळेत दप्तरी ठेवणेत यावे.

५) शाळा सुरु करण्यापूर्वी सर्व शिक्षकांचे लसीकरण पूर्ण करुन घेणेत यावे.

६) वर्गखोली तसेच स्टाफरुम मधील बैठकव्यवस्था शारीरिक अंतर (Physical Distance) च्या नियमानुसार असावी.

७) शाळेत दर्शनी भागावर (Physical Distance), मास्कचा वापर इत्यादी संदर्भात मार्दर्शक सूचना Posters / Stickers असणारे लावले का? शाळेच्या अंतर्गत व बाह्य परिसरामध्ये रांगेत उभे राहण्याकरिता किमान ६ फुट इतकी शारीरिक अंतर (Physical Distance) राखले जाईल याकरिता विशिष्ट चिन्ह लावली आहे का ? शारीरिक अंतर (Physical Distance) राखण्यासाठी येण्या व जाण्याचे वेगवेगळे मार्ग निश्चित करणा-या बाणाच्या खुणा केल्या आहेत का? याबाबतची व्यवस्था शाळेने करणे आवश्यक राहील.

८) विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी त्यांच्या पालकांची लेखी सहमती शाळा प्रमुखांनी प्राप्त करुन घेण्यात यावी.

९) शाळेत व शाळेच्या परिसरात स्वच्छता व आरोग्यदायी परिस्थिती राखण्याकरीता शाळेचा परिसर दररोज नियमितपणे स्वच्छ केला जातो का ? स्वच्छतागृहांचे वारंवार निर्जंतुकीकरण केले जाते याबाबतची शाळेच्या मुख्याध्यापकांनी खात्री करुन घेणे आवश्यक राहील.

१०) विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी शाळा वाहतुकीच्या वाहनांचे दिवसातून किमान दोन वेळा (विद्यार्थी वाहनात बसण्याअगदोर व उतरल्यानंतर ) निर्जंतुकीकरण केले जाते का ? याची खातरजमा शाळा व्यवस्थापनाने करावी.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

सोबत – १) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण२०२१/प्र.क्र.११३ /एसडी-६, दि.१० ऑगस्ट २०२१
२) शासन परिपत्रक क्र.संकिर्ण२०२१/प्र.क्र.११३ /एसडी-६, दि.२४ सप्टेंबर २०२१

प्रत –

१) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
२) मा. जिल्हाधिकारी, पुणे.
३) मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
४) सर्व संबंधित

१/१०/२१

अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.